REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २० नोव्हेंबर, १९४० अंक ४६

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

## रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

# विविध माहिती

### व्हाइसरॉयांची बैलाची देणगी

"व्हाइसरॉयसाहेबांच्या हुकुमान्वयें आणि त्यांच्यातर्फे हा बैल मी आतां रूरल रीकन्स्ट्रक्शन लीगला नजर करतों. हा बैल केवळ व्हाइसरॉय साहेबांसच ब्रम्ही लोकांबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीचें प्रतीक नसून, एकूण सर्व हिंदवासीयांस ब्रह्मदेशांतील लोकांसंबंधीं वाटणाऱ्या स्नेहाचें तें चिन्ह आहे" असें म्हणून हिंदी सरकारचे एजंट, मि. आर. एच. हचिन्स, ह्यांनीं व्हाइसरॉयांतर्फे एक बैल रंगून येथील ग्रामोद्धार संघास नजर केला.

### विमानांचें वाढतें उत्पादन

विमानें तयार करण्यांत अमेरिकेंतील १½ लक्ष कामगार गुंतलेले आहेत. बारा महिन्यांपूर्वी त्यांची संख्या २७ हजार होती. लवकर ती २½ लाखांवर जाईल.

### ग्रेटब्रिटनची कॅनडांत खरेदी

ग्रेटब्रिटननें युद्धाच्या दुसऱ्या वर्षांत कॅनडाकडून सुमारें ४०½ कोटि रुपयांची अन्नसामुग्री विकत घेण्याचें ठरविलें आहे. ह्यांत गव्हाच्या खरेदीची किंमत समाविष्ट नाहीं.

### साखरेच्या धंद्यास सहाय

हिंदुस्थान सरकारनें चालू हंगामांत २ लक्ष टन व पुढील हंगामांत २ लक्ष टन हिन्दी साखर ग्रेटब्रिटनमध्यें खपवून देण्याची व्यवस्था करावी; ब्रह्मदेश, सीलोन, अफगाणिस्तान येथेंहि तिच्या निर्गतीची खटपट करावी; त्याचप्रमाणें, एक्साइज ड्यूटी कमी करून ती टनास २ रुपयांवर आणावी, म्हणजे साखरेचा खप वाढण्यास सहाय होईल, असें आपलें मत श्री. एम्. पी. गांधी ह्यांनीं नुकतेंच व्यक्त केलें आहे.

### म्हैसूरची सरकारी विमा-योजना

म्हैसूर सरकारचें एक स्वतंत्र विमा-खातें आहे, त्यांत म्हैसूर प्रजाजनांस विमा उतरतां येतो. विम्याची रकम परत देण्यास सरकारी करांचें उत्पन्न बांधलेलें आहे व व्यवस्थेचें सर्व काम काटकसरीनें करण्यांत येतें. सरकारी नोकरांस विम्याची सक्ति आहे.त्यांचे विमे वगळले तरी गेल्या वर्षी इतरांचे५९ लक्ष रुपयांचे विमे ह्या खात्यानें उतरले.

### स्थलांतरामुळें होणारी खर्चांत वाढ

मध्यवर्ती सरकारच्या कांहीं कचेऱ्यांचें उन्हाळ्यांत सिमल्यास स्थलांतर करण्यांत येतें, त्यामुळें टेलिफोनचा व कागदपत्रें आणण्या-नेण्याचा खर्च सुमारें १ लक्ष रुपये होतो.

### रुमेनियांतील पेट्रोलचें उत्पादन व त्याची निर्गत

| जानेवारी ते जुलै | उत्पादन (टन) | निर्गत (टन) |
|---|---|---|
| १९३९ | ३०,९९,७८९ | २२,३१,९०१ |
| १९४० | ४०,४४,५८४ | १७,९९,९८४ |

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न

| १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर | रुपये |
|---|---|
| १९३९ | ६२ कोटि, ६१ लक्ष |
| १९४० | ६९ कोटि, २९ लक्ष |

### म्हैसूरमध्यें सोन्याच्या नवीन खाणी

म्हैसूरमध्यें शिमोगा जिल्ह्यांत सोनें सापडण्याचा संभव आहे. त्यासंबंधीं जमीन खोल खणून योग्य ती पूर्वचौकशी करण्याकरितां म्हैसूर सरकारनें ५० हजार रुपये मंजूर केले आहेत.

### दि म्हैसूर सिल्क फिलेचर्स, लि.

श्री. नारायणराव नाईक ह्यांनीं, रेशमी किड्यांच्या कोशित्यांपासून रेशीम धातीवर चढविण्यासाठीं म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. ही कंपनी स्थापन केली, तिच्या व्यवहाराच्या ३० जून असेरच्या दुसऱ्या वर्षांत तिला ३,१९१ रुपये नफा झाला. त्यांत गेल्या वर्षीतून ओढलेला ७११ रु. नफा मिळवून त्यांतून प्रत्येक भागास २ आणे प्रमाणें करमाफ डिव्हिडंड वाटण्यासाठीं ३,४७२ रुपयांचा विनियोग करण्याचें ठरलें.

### रेडिओचे परवाने

सप्टेंबर, १९४० अखेर हिंदुस्थानांत एकूण १,१३,३११ रेडिओचे परवाने चालू होते. मार्च, १९४० अखेरच्या मानानें हा आकडा १५,७७६ नें मोठा आहे. १९३९ च्या तत्सम सहामाहींत ११,४२३ रेडिओ परवान्यांची भर पडली होती.

### ट्रेझरी बिलांवर १५ आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ३ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें द. सा. द. शे. सरासरी १५ आ. ११ पै व्याजाच्या दरानें विकलीं.

### मोटारींच्या नंबर प्लेट्स टाकूं नका

मोटार मालकांनीं आपल्या मोटारींच्या नंबराच्या ॲल्युमिनिअमच्या जुन्या पाट्या टाकून न देतां त्यांनीं त्या वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाइल असोसिएशनकडे पाठवाव्या, म्हणजे उपयुक्त धातु ह्या दृष्टीनें त्या ग्रेटब्रिटनकडे धाडण्यांत येतील अशी असोसिएशनची विनंति आहे.

### दारूबंदीसंबंधीं मद्रास सरकारचा अनुभव

दारूबंदीसंबंधीं लोकांचा उत्साह मावळला असून त्यासंबंधांत सरकारी अधिकाऱ्यांशीं जनता सहकार्य करीत नाहीं, असा मद्रास सरकारचा अभिप्राय आहे. दारूबंदीमुळें विशेषतः गरीब लोकांचा पुष्कळ फायदा झाला आहे. परंतु चोरून दारू गाळण्याचे प्रयत्न अधिकाधिक होत आहेत, असेंहि सरकारचें म्हणणें आहे. सालेम, कडाप्पा, चित्तूर व अर्काट ह्या चार जिल्ह्यांत दारूस बंदी आहे.

### वार्षिक जागतिक उत्पादन

| | टन |
|---|---|
| पेट्रोल | २७ कोटि, २० लक्ष |
| गहूं | १२ कोटि, २६ लक्ष |
| कोळसा | १३० कोटि, ७४ लक्ष |
| साखर | २ कोटि, ७० लक्ष |
| कपास | ८३ लक्ष |
| सोनें | १,१०० |

### तारे

मनुष्य नुसत्या डोळ्यानें फार तर ३½ हजार तारे पाहूं शकतो. मोठ्या दुर्बिणीच्या साहाय्यानें ४ ते ६ कोटि तारे दिसूं शकतात.

### लोकर

२०० वर्षांपूर्वी प्रत्येक मेंढीपासून १ शेर लोकर सरासरीनें मिळत असे. आतां ती ४ शेरांपर्यंत मिळते.

### अंगठा

एकाद्या माणसाचा अंगठा उठवला, तर तसाच दुसऱ्याचा अंगठा उठण्याचा संभव ९,८०० वर्षांत येणार नाहीं. अंगठ्यावरील रेषांत इतका फरक असतो.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ५७८ | ५ सहकारी कायदा | ५८२ |
| २ असेंब्लींत फिनॅन्स बिल | ५७९ | ६ फ्रान्सच्या अपयशाचीं कारणें | ५८३ |
| ३ मुंबई सहकारी बँक्स असोसिएशन | ५८० | ७ जमखंडी स्टेट सें. को. बँक | ५८४ |
| ४ स्फुट-विचार बँकांची रोकड शिलक—रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती—युद्धोपयोगी मालाचा पुरवठा आणि स्टोअर्स खातें—युद्धाची आजची परिस्थिति | ५८१ | ८ अमेरिकेच्या अध्यक्षाची निवडणूक | ५८५ |
| | | ९ सर चार्लस मॅलेट ह्यांचीं पत्रें | ५८५ |
| | | १० निवडक बाजारभाव | ५८६ |



# अर्थ

बुधवार, ता. २० नोव्हेंबर, १९४०


## असेंब्लींत फिनॅन्स बिल

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें हिंदुस्थान सरकारच्या फडणविसांनीं चालू सालाकरितां जादा खर्चाचें आणि करांचें दुरुस्त अंदाजपत्रक व त्या विषयींच्या कायद्याचा मसुदा हीं मांडलीं आहेत. गेला आठवडाभर ह्या बिलाची प्राथमिक चर्चा चालली होती. काँग्रेसचे प्रतिनिधी सभासद सध्या असेंब्लींत उपस्थित असल्यानें फिनॅन्स बिलाच्या चर्चेंत गरम वातावरण निर्माण झालें होतें. ह्या बिलावरील भाषणें त्यांतील विषयास मर्यादित झालीं पाहिजेत असा निर्बंध नाहीं. अंदाजपत्रकाच्या आणि करयोजनेच्या प्रथम चर्चेच्या वेळीं सभासदांनीं सरकारच्या सर्वसाधारण व विवक्षित धोरणावर टीका करण्यास हरकत नाहीं असा परिपाठ असल्यानें युद्ध खर्च व युद्ध कर ह्यांच्या मर्यादेबाहेर जाऊन टीकाकारांनीं भाषणें केलीं. युद्धपरिस्थिति हा विषयच एवढा विस्तृत आणि जिव्हाळ्याचा आहे कीं, तिच्यापासून निर्माण होणाऱ्या अनेक आर्थिक, संपात्तिक व राजकीय प्रश्नावर मतप्रदर्शन होणें फिनॅन्स बिलाच्या चर्चेच्या प्रसंगीं अपरिहार्य आहे. प्राप्तीवरील कराच्या दरांत वाढ इत्यादि जादा उत्पन्नाच्या योजना फडणविसांनीं सुचवल्या आहेत, त्यांची आजच आवश्यकता नाहीं, वार्षिक अंदाजपत्रकाचे वेळीं पुढील फेब्रुवारींत ह्या सबंध विषयाचा विचार करणें युक्त होईल, करांपेक्षा कर्जाच्या मार्गानें जादा पैसा उभा करणें योग्य होणार आहे. इत्यादि प्रकारांची मूलग्राही टीका फिनॅन्स बिलावर झाली आहे, असेंब्लीचें अधिवेशन ह्यापूर्वी भरवून सरकारनें तिला विश्वासांत घेणें आवश्यक होतें असें मतहि व्यक्त करण्यांत आलें आहे. स्वतःच्या संरक्षणासाठी हिंदुस्थानास जादा युद्धखर्च करणें प्राप्त असल्यानें तो मर्यादित होण्याचें महत्त्व व्यावहारिकदृष्ट्या विचार करणारांनीं प्रतिपादलें आहे. युद्धखर्च तर अपरिहार्य आहे आणि त्याची तरतूद केल्यावांचून गत्यंतर नसल्यानें अवांतर गोष्टी बाजूस सारून नवीन करयोजनेच्या प्रश्नास स्वतःस मर्यादित करून घेणें आपणांस प्राप्त आहे अशी भूमिका हिंदुस्थान सरकारचे फडणविसांनीं घेणेंहि स्वाभाविक आहे. युद्धाच्या तयारीसाठीं अनेक अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यांत आल्या आहेत त्यांचे पगार फाजील मोठे असून खर्चांत काटकसर होण्यास पुष्कळ जागा आहे अशी टीका करण्यांत आलेली आहे, तिला फडणविसांकडून समाधानकारक उत्तर मिळणें मात्र अगत्याचें आहे. जादा खर्च आणि कर ह्यांच्या सयुक्तिकपणाविषयीं त्यांनीं असेंब्ली आणि जनता ह्यांची खात्री केली पाहिजे. सर जरेमी रेस्मन ह्यांच्या उत्तरादाखल केलेल्या भाषणांत ह्या सर्व गोष्टींचा समाचार घेण्यांत येणें फिनॅन्स बिलाच्या प्राथमिक चर्चेच्या पद्धतीस अनुसरून आहे.

अनेक लोकपक्षीय सभासदांनीं नवीन करांची योजना बाजूस सारून मूलभूत राजकीय गाऱ्हाण्यांचा हल्ला सरकारावर चढवला, ही गोष्ट असेंब्लींतल्या चर्चेचा वृत्तपत्रीय सारांश वाचतांना डोक्यांत भरते. सरकारी अधिकारी व त्यांचे सहकारी गट ह्यांनींहि आपल्या प्रतिपक्षाचा खरपूस समाचार घेण्यास सोडलें नाहीं. असेंब्लींतल्या चर्चेस अनेक वेळां बेजबाबदारपणाचें स्वरूप येतें असा नेहमींचा अनुभव आहे. सरकारच्या बाजूस त्याचे अधिकारी व पाठिराखे जय्यत तयार असल्यानें वादविवादांत अखेर बहुमत लोकपक्षाविरुद्ध जावयाचें ह्या भावनेनें त्या पक्षाच्या सभासदांत आपल्या भाषणास जबाबदारीच्या मर्यादा घालण्याची प्रवृत्ति दिसून येत नाहीं. कित्येक प्रसंगीं सरकारच्या बाजूस अल्पमत झालें तरी व्हाइसरॉयांस आपल्या सर्टिफिकेशनच्या अधिकाराचा उपयोग करून लोकपक्षीय बहुमत धाब्यावर बसवतां येतें. ह्या कारणानें असेंब्लींतला वादविवाद लटुपुटीच्या खेळासारखा गमतीचा विषय बनतो. गेल्या आठवड्यांत काँग्रेसपक्षीय सभासदांनीं सरकारावर चढवलेल्या हल्ल्यास सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं तितक्याच आवेशानें व जोरानें उत्तर दिलें. फिनॅन्स बिलावरील चर्चेंत निरनिराळ्या पक्षांच्या वक्त्यांचीं जीं भाषणें झालीं त्यांचा मथितार्थ येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. त्यांचे तीन वर्ग करतां येतील. सरकार व सामान्यतः युरोपिअन गट एका टोंकास, काँग्रेसपक्षीय सभासद दुसऱ्या टोंकास याप्रमाणें हे दोन वर्ग एकमेकांपासून अत्यंत दूर अंतरावर अधिष्ठित होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या भाषणांच्या भूमिकाच भिन्न होत्या. ह्या दोन टोंकांच्यामध्यें उपस्थित असलेल्या वक्त्यांनीं सरकारास सर्वसाधारण प्रकारचा पाठिंबा देऊन कित्येक तपशिलाच्या पण महत्त्वाच्या बाबतींत कडक टीका केली. त्यांतली बरीच टीका विधायक स्वरूपाचीहि होती. कांहीं मध्यवर्ती सभासदांनीं दोन्ही विरुद्ध बाजूस दोष दिला आणि तडजोडीचा मार्ग सुचवला. ब्रिटिश सरकारच्या धोरणाविरुद्ध कोणाचीं कितीहि गाऱ्हाणीं असलीं तरी युद्धपरिस्थितीचा गंभीरपणा आणि हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या जय्यत तयारीचें अगत्य ह्या गोष्टी शिल्लक रहातात आणि त्या दृष्टिआड करण्यांत स्वारस्य नाहीं असा कांहीं सभासदांच्या भाषणाचा सारांश होता असें म्हणतां येईल. असेंब्लींत फिनॅन्स बिलावर प्राथमिक चर्चा झाली ती त्या बिलाच्या मुख्य विषयास सोडून आणि म्हणून गैरलागू होती असें अनुमान काढणें चुकीचें होईल हें आम्हीं वर ध्वनित केलेंच आहे. युद्धाच्या आणीबाणीच्या काळांत सरकारचा कारभार अत्यंत काटकसरीचा आणि हिंदुस्थानच्या आर्थिक व राजकीय आकांक्षांस परिपोषक असा असावा ह्या आशयाच्या भाषणांचा रोख स्पष्टच आहे आणि त्याचा योग्य परामर्श सरकारास घेतला पाहिजे.

## मुंबई सहकारी बँक्स असोसिएशन

### १९३९-४० चा पहिला वार्षिक अहवाल

ऑगस्ट, १९३८ मध्यें मुंबई येथें मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांची परिषद् प्रो. वा. गो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं सेंट्रल आणि अर्बन बँकांच्या आर्थिक व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्यासाठी व त्यांच्या हितसंबंधांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापण्यांत यावी, ह्या अर्थाचा एक ठराव मंजूर झाला. परिषदेच्या स्टँडिंग कमिटीकडे ह्या संस्थेची घटना तयार करण्याचें काम देण्यांत आलें व ही घटना एक स्वतंत्र परिषद बोलावून तिचेपुढें मंजुरीसाठी ठेवावी असें ठरलें. ह्या खास परिषदेनें घटनेचा मसुदा सर्वसाधारणपणें मान्य केला व तपशीलवार नियम करण्यासाठी तिनें एक लहानशी समिति नेमली. ह्या समितीनें तयार केलेल्या नियमांस पुढें परिषदेच्या स्टँडिंग कमिटीनें मंजुरी दिली. मुंबई प्रांतांतील १३ मध्यवर्ती बँकांपैकीं १२ बँका असोसिएशनच्या सभासद् झाल्या आहेत. प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँकहि सभासद् आहे. २३ अर्बन बँकांचें नांव असोसिएशनच्या पटावर आहे.

### संस्थेचे उद्देश

बँकांच्या नोकरवर्गाच्या शिक्षणाची व्यवस्था करणें, पैशाच्या वर्गावर्गीचें नियमन करणें, आर्थिक परिस्थितीबाबत माहिती मागविणें व जरूर असल्यास ती प्रसिद्ध करणें, आर्थिक बाबतींत सल्ला देणें, मधून मधून परिषदा भरविणें आणि सर्वसाधारणपणें सेंट्रल व अर्बन बँकांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणणें, असे असोसिएशनचे उद्देश आहेत. ऑक्टोबर, १९३९ मध्यें असोसिएशनच्या कामास खरा प्रारंभ झाला. ऑगस्ट, १९३८ मधील परिषदेंत सहकारी रजिस्ट्रार, श्री. भणसाळी, ह्यांनीं आश्वासन दिल्याप्रमाणें त्यांनीं असोसिएशनशीं सहकारी प्रश्नांबाबत वेळोवेळ विचारविनिमय केला व कित्येक प्रसंगीं आपल्या स्वतःच्या मनाच्या कलाविरुद्ध असलेलें असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाचें मत मान्य केलें. ह्या सहकार्यामुळेंच असोसिएशनची उपयुक्तता प्रभावी होऊं शकली. सेंट्रल आणि अर्बन बँकांनींहि मनापासून असोसिएशनशीं सहकार्य केलें.

### गेल्या वर्षांतील कार्य

सहकारी बँकांना विशेष संकट उद्भवल्यास सरकारी सहाय मिळण्याची आवश्यकता, सहकारी बँकांची आर्थिक परिस्थिति दर्शविणारे तक्ते नियमित प्रसिद्ध होण्याची व्यवस्था, वसूल व्हावयाचें व्याज ताळेबंदांत कसें दाखवावयाचें व थकलेल्या व्याजाची व्यवस्था कशी करावयाची ह्यासंबंधीं तरतूद, रोख्यांच्या किंमतीमधील झालेल्या घटीचा सहकारी बँकांच्या नफावाटणीवरील परिणाम, ऑडिटसंबंधीं व्यवस्था, बँकांच्या परस्परांवरील चेक्स व ड्राफ्ट्सच्या वसुलीची व्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राव्हिडंड फंडांची सहकारी बँकांमार्फत सरकारी रोख्यांत गुंतवणूक, पिकांस भांडवल पुरवठा, मल्टिपर्पज सोसायट्यांची घटना व त्यांचा कारभार, मध्यवर्ती बँकांच्या घटनेंत एकसूत्रीपणा, रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग कायद्याबाबत सूचना, प्राथमिक लँड मॉर्गेज बँकेकडे ज्यांनीं आपली मालमत्ता लावून दिली आहे अशांना कर्जें देण्याचा प्रश्न, इत्यादि अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा असोसिएशनच्या कार्यकारी मंडळानें विचार करून इष्ट त्या दिशेनें सुधारणा घडवून आणण्याचा यत्न केला. सहकारी संस्थांचे व्यवहार व मालाचा उठाव ह्यांचा ह्यापुढें निकट संबंध येणार असल्या कारणानें एक मार्केटिंगचा खास शिक्षणवर्ग भरविण्याचें असोसिएशननें ठरविलें, परंतु कांहीं अडचणींमुळें तो वर्ष संपण्याचे आंत भरूं शकला नाहीं. सप्टेंबरमध्यें तो भरविण्यांत आला. अनेक किरकोळ प्रश्नांवरील आपलें मत असोसिएशननें रजिस्ट्रारला वेळोवेळ कळविलें.

### कार्याचें महत्त्व व सहकार्याची आवश्यकता

मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणून त्यांत सुधारणा घडवून आणण्याचें महत्त्वाचें काम असोसिएशन करीत आहे, व त्यास सहकारी खातें आणि सभासद बँका ह्यांचें तिला त्यांत पाठबळ मिळत आहे. रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणें, असोसिएशनच्या सभासदांच्या संख्येंत मोठी भर पडून तिचें प्रातिनिधिक स्वरूप आणखी पक्कें झालें म्हणजे तिला आणखी ज्यास्त उपयुक्त कार्य करतां येईल, हें उघड आहे. श्री. वैकुंठराय मेहता, हे असोसिएशनचे ऑनररी सेक्रेटरी आहेत. त्यांच्या मदतीचा लाभ असोसिएशनला झाला ही तिचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ज्या बँका अद्याप असोसिएशनचे सभासद् झाल्या नसतील, त्यांनीं शक्य तितक्या लवकर ह्या प्रातिनिधिक संस्थेंत सामील होणें त्यांच्या स्वतःच्या व व्यापक दृष्टीनें सहकारी चळवळीच्या फायद्याचें आहे.

### असोसिएशनची फी

| खेळतें भांडवल | फी ( रुपये ) |
|---|---|
| १ लाखापेक्षां कमी | ३० |
| १ ते ५ लक्ष | ६० |
| ६ ते १० लक्ष | १०० |
| ११ ते २५ लक्ष | १५० |
| २६ ते ५० लक्ष | २०० |
| ५० लक्षांहून अधिक | ३०० |

महिलांचें भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणे २.

## स्फुट विचार

### बँकांची रोकड शिल्लक—रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती

रिझर्व्ह बँकेपाशीं प्रत्येक जोडलेल्या (शेड्यूल्ड) बँकेनें आपल्या ठेवींच्या ठराविक प्रमाणाइतकी रोकड रासली पाहिजे असा कायद्याचा नियम आहे. बिगर शेड्यूल्ड बँकांसहि कंपनी कायद्यान्वयें अशी रोकड स्वतःजवळ बाळगावी लागते आणि ती ठेवली न गेल्यास त्यांस दंड द्यावा लागतो. ह्या प्रकारची दंडाची तरतूद रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत ४२ व्या कलमाच्या दुरुस्तीनें करण्यांत येत आहे. मध्यवर्ती असेंब्लींत त्यासाठी दुरुस्तीचें बिल फडणाविसांनीं पुढें मांडलें आणि तिला संमति मिळवली. रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती बोर्डास शेड्यूल्ड बँकांच्या ठेवीदारांच्या हिताचे संरक्षणार्थ ह्या प्रकारची दंडाची योजना करणें अगत्याचें वाटल्यावरून त्यासंबंधांत कायद्यांत तजवीज होत आहे. ठरलेल्या प्रमाणांत जवळ रोकड नसणें हें बँकांच्या कमजोरपणाचें लक्षण आहे. ठेवीदारांचा पैसा मागणीबरहुकूम परत देण्याची पात्रता प्रत्येक बँकेस असली पाहिजे. बिनव्याजी पैसा रोकडीमध्यें अडकून रहातो ह्या सबबीवर बँका तो किफायतशीर कर्जांत गुंतवतात आणि वेळेस पैसा हातीं न आल्यानें संकटांत पडतात, असा अनुभव रिझर्व्ह बँकेस आला असल्यानें दंडाची योजना कायद्यांत समाविष्ट करण्याचा सल्ला तिनें सरकारास दिला. कायद्यांतील दुरुस्ती ह्याहि पुढें गेली असून प्रमाणशीर रोकड ज्या बँकेजवळ नसेल तिनें नवीन ठेवी घेतां कामा नयेत असा निर्बंध घालण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस देण्यांत येत आहे. ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत जवळ शिल्लक नसतांना आणखी ठेवी स्वीकारणें म्हणजे ठेवीदारांच्या हितास अगोदरच उत्पन्न झालेला धोका वाढवणें होय, असें सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं वरील दुरुस्तीच्या समर्थनार्थ सांगितलें. बँकांचा स्वतंत्र कायदा होण्यास अजून अवधि असल्यानें प्रस्तुतची दुरुस्ती अगत्याची म्हणून तातडीनें केली जात आहे असेंहि ते म्हणाले.

---

### युद्धोपयोगी मालाचा पुरवठा आणि स्टोअर्स खातें

सरकारी कामास लागणारा माल शक्यतोंवर हिंदुस्थानांतील व्यापारी आणि कारखानदार ह्यांचेकडून खरेदी केला जाण्याचे हेतूनें हिंदी स्टोअर्स खात्याचा कारभार चालवला जात आहे. युद्धामुळें मालाची सरकारी खरेदी प्रचंड प्रमाणांत वाढली असून तिच्या व्यवस्थेसाठी एक स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत आलें आहे. हिंदी व्यापारी संघांच्या मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी समितीची दिल्ली येथें नुकतीच सभा झाली. तीमध्यें ह्या दोन खात्यांच्या कार्यांच्या मर्यादांचे संबंधांत चर्चा झाली. मालाच्या सरकारी खरेदीच्या व्यवस्थेचा फेरविचार होऊन जरूर तर तिची पुनर्घटना व्हावी अशी सूचना सरकारास करण्यांत आली आहे. तिच्या बाबतींत हिंदी व्यापारी संघांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदी स्टोअर्स खात्याचें कार्य चांगल्या रीतीनें चाललें असून त्याच्या मार्फत हिंदी धंदेवाल्यांस लहान-मोठ्या ऑर्डर्स मिळत आहेत. ह्याकरितां त्या खात्याच्या कार्यामध्यें कोणताहि बदल करण्यांत येऊं नये. निदान तें कार्य मर्यादित होईल किंवा त्याचा अधिकार नियंत्रित होईल अशी व्यवस्था कटाक्षसर आणि हिंदी धंद्यांचें हित ह्यांचे दृष्टीनें अनिष्ट आहे असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. युद्ध-पुरवठा खात्याच्या हुकमतीखालीं स्टोअर्स खात्याची उपयुक्त कामगिरी स्थगित होऊन, मालाच्या ऑर्डरी समाधानकारक रीतीनें आज टेंडर्स मागवलीं जाऊन देण्यांत येत आहेत, त्यांचें मार्गांत व्यत्यय येण्याचा संभव आहे, हें हिंदी व्यापारी मंडळ्यांचें म्हणणें सरकारनें लक्षांत घेणें आवश्यक आहे. मालाच्या पुरवठ्याची व्यवस्था जेवढी विस्तृत असेल तितकें चांगलें; कारण, तिच्या योगानें अनेक व्यापाऱ्यांस व कारखानदारांस ह्या व्यवसायांत हिस्सा मिळून फायद्याची वांटणी समाधानकारक होते. अनेकांस धंद्याची संधी मिळणें युद्ध-परिस्थितींत आवश्यक आहे.

---

### युद्धाची आजची परिस्थिति

जर्मनीस सहाय देण्यासाठीं आणि विशेषतः आफ्रिकेंत स्वतःचा डाव साधण्यासाठीं इटलीनें ग्रीसची कुरापत काढून त्या देशावर स्वारी केली. ग्रीक लोक धमकीस भिऊन आपणास स्वतःच्या देशांतील मोक्याच्या जागांचा उपयोग भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमारास शह देण्याकडे करूं देतील अशी मुसोलिनीची कल्पना होती. आल्बेनिया इटलीनें जसा घशाखाली घातला आणि रुमानियांत ज्या रीतीनें जर्मनीनें आपलें वर्चस्व स्थापलें त्याप्रमाणेंच ग्रीसची अवस्था करतां येईल असें त्यास वाटत होतें. तसेंच, इंग्लंडचें सहाय ग्रीसला न मिळूं शकल्याकारणानें त्या देशावरची स्वारी सोपी आणि स्वस्त पडेल अशीहि अटकळ मुसोलिनीनें बांधली असली पाहिजे. त्यामुळें ग्रीक फौजेनें दाखवलेली तडफ व इटालिअन फौजांस मागें हटवण्यांत प्रकट केलेलें शौर्य त्याच्या अपेक्षेच्या पलीकडचें होतें. ब्रिटिश विमानदल आणि आरमार ह्यांनीं ग्रीसला दिलेल्या कुमकेची भर मुसोलिनीच्या अडचणींत पडली आहे, ही ग्रीक रणांगणावरील परिस्थिति आहे. मुसोलिनीच्या जर्मन दोस्तासहि अलीकडे ब्रिटिश विमानांच्या त्याच्या देशावरील हल्ल्यांमुळें पुढें काय करावें हें सुचनासें झालें आहे असें दिसतें. ग्रेट ब्रिटनवरील स्वारीच्या हिटलरच्या वल्गना फोल ठरल्या आहेत आणि पुढें पाऊल कसें व कोठें टाकावें ह्याच्या विवंचनेंत तो आज आहे. रशियन सरकारच्या प्रतिनिधीस बर्लिनला बोलावून त्याच्याशीं हिटलरनें नुकतेंच खलबत केलें आहे आणि इटली व स्पेन ह्यांसहि आपल्या कटांत घेण्याची त्याची खटपट चालली असल्याचें दिसतें. इंग्लंडवर दररोज विमानें पाठवून त्यांच्याकरवीं बॉंब फेकण्याचा क्रम मात्र जर्मनीनें चालू ठेवला आहे. बाकी चढाईचें हिटलरचें धोरण ब्रिटिश विमानांच्या पराक्रमामुळें थंडावलें आहे आणि ह्यासंबंधांत त्याचा बेत सपशेल फसला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

#### इलेक्ट्रिकल सुपरवायझर्स व वायरमेन ह्यांची परीक्षा

इलेक्ट्रिकल सुपरवायझर्स व वायरमेन ह्यांच्या परीक्षेस मुंबई, पुणें व अहमदाबाद येथें ता. २७ जानेवारी १९४१ रोजीं प्रारंभ होईल.

#### हिंदी लोक परतले

जपानमधील हिंदी लोक आपल्या कुटुंबियांस परत हिंदुस्थानाकडे पाठवूं लागले आहेत. ब्रिटिशांविरुद्ध जपानमधील वाढती तेढ हें त्याचें कारण आहे.

# सहकारी कायदा

## दोन महत्त्वाचे सरकारी ठराव

### गहाणदस्त व निवाडे

( लेखक—श्री. के. बा. गजेंद्रगडकर वकील, सातारा )

रजिस्टर गहाण दस्तावरून कोर्टामध्यें फिर्याद न आणतां धनको व ऋणको यांना आपसांत निवाडा करितां येतो. नंतर तो निवाडा कोर्टांत गुदरून त्याप्रमाणें स्वतंत्र कोर्टाचा हुकूमनामा होतो. दुरुस्त केलेला रजिस्ट्रेशन कायद्याप्रमाणें गहाण दस्तावरून केलेला लवादनिवाडा रजिस्टर करून घ्यावा लागतो व मग तो रजिस्टर केलेला निवाडा कोर्टांत गुदरावा. त्यावरून कोर्ट हुकुमनामा करितें. आतां असा प्रश्न आहे कीं, सोसायटीच्या गहाण दस्तावरून रजिस्ट्रारनें नेमलेल्या लवादानें आपला निवाडा दिला तर असा निवाडा रजिस्टर करून घेण्याची जरूर आहे काय? हा प्रश्न नुकताच मुंबई हायकोर्टापुढे आला होता. त्यामध्यें हायकोर्टानें अशा प्रकारचे रजिस्ट्रारनें नेमिलेल्या लवादानें गहाणदस्तावरून दिलेले निवाडे रजिस्टर करण्याची जरूर नाहीं असा निर्णय दिला आहे. कारण जरी अशा लवादाच्या निकालास "निवाडा" म्हणतात तरी वास्तविक त्याची योग्यता कोर्टानें केलेल्या हुकूमनाम्याप्रमाणेंच असते. अशा निवाड्यावरून कोर्टांत दरखास्त देतां येतें, आणि कायद्यानें हुकूमनामा रजिस्टर करण्याची जरूर नाहीं. हा को-आपरेटिव्ह कायद्याच्या निवाड्याचा विशेष फायदा आहे. बाकीच्या सर्वसाधारणपणें लवादानें केलेले निवाडे कोर्टांत गुदरावे लागतात. व त्यावरून कोर्ट आपले हुकूमनामे करितें. हा निर्णय सर्क्युलरनें एडीएम १५२ ता. १८ मे १९४० मध्यें सरकारनें जाहीर केला आहे.

### मुंबई सहकारी कायद्याखाली केलेल्या नियमांपैकी ३२ व्या नियमान्वयें द्यावयाची नोटीस.

मुंबई को-आपरेटिव्ह ॲक्टच्या ३२ व्या नियमान्वयें लवादानें वादी व प्रतिवादी या दोघांनाही दाव्याचीं समन्सें काढण्यापूर्वी नोटीस देऊन तुम्हांस आपला स्वतंत्र लवाद नेमणें आहे काय म्हणून चौकशी केली पाहिजे व १५ दिवसांची मुदत त्यांना दिली पाहिजे. १५ दिवसांत जर पक्षकारांनीं त्यासंबंधीं कांहीं कळविलें नाहीं तर मग लवादानीं दाव्याचीं समन्सें काढावींत. हा नियम लवादावर बंधनकारक आहे. मग प्रश्न असा येतो कीं, लवादानें नोटीस न काढतां एकदम दाव्याचीं समन्सेंच पक्षकारास काढलीं व त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन आपला निवाडा दिला तर असा निवाडा प्रथम ३२ नियमान्वयें नोटीस न काढल्यामुळें बेकायदेशीर होतो काय? नोटीस न काढतां एकदम समन्सेंच काढलीं व समन्साप्रमाणें हजर होऊन पक्षकारानें आम्हांस नोटीस नाहीं अशी तक्रार लवादापुढे केली नाहीं तर त्यांनीं आपला हक्क गमावला आहे असें समजावें व मग लवादानें केलेला निवाडा बेकायदेशीर होत नाहीं. सबब ह्यापुढे या कायद्याखालील लवादांनीं नोटीस न काढतां एकदम समन्सेंच काढावींत व पक्षकारांनीं नोटीस नाहीं म्हणून तक्रार न केल्यास एकदम निवाडा द्यावा. हा निवाडा बेकायदेशीर होणार नाहीं. हा निर्णय सरकारनें एबीएन २०-१९४० ता. १९-९-४० च्या सर्क्युलरमध्यें जाहीर केला आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चेवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## फ्रान्सच्या अपयशाचीं कारणें

फ्रान्सचें अपयश हें केवळ तात्कालिक लष्करी पराजयाच्या स्वरूपाचें नसून अनेक आर्थिक व राजकीय बाबींशीं त्याचा निकट संबंध आहे. लष्करी क्षेत्रांतही केवळ एखाद्या लढाईत दुर्दैवानें अगर शत्रुपक्षाचें तात्कालीत बल अधिक असल्यानें होणाऱ्या पराजयासारखा आजचा फ्रान्सचा पराजय नाहीं. त्याचीं कारणें जितकीं खोल तितकेच त्याचे परिणाम दीर्घगामी होणार आहेत. १८१५ मध्यें नेपोलियनचा वॉटर्लूला पराजय झाला. परंतु फ्रेंच राष्ट्रास त्यानें म्हणण्यासारखा धक्का बसला नाहीं. नुकत्याच झालेल्या फ्रान्सच्या पराजयानें मात्र सर्व फ्रेंच जीवनाचा पाया ढळमळून तोल सुटल्यासारखा झाला आहे.

फ्रेंच लोक जसे कर्तृत्ववान तसेच सुखलोलुप असल्यानें आणि कोणतीही गोष्ट करावयाची झाली तर ती उत्कटपणें करण्याचा त्यांचा स्वभाव असल्यानें फ्रेंच इतिहासांत उज्ज्वल व निकृष्ट अशा कालखंडांची पाठशिवी चाललेली दिसते. लष्करी संघटना जोमदार व नागरिकांमध्यें आक्रमक वृत्तीचा संचार ह्यांची जरूर असते. 'आक्रमण हाच संरक्षणाचा उत्कृष्ट मार्ग होय' हें तत्त्व अनेक अर्थांनीं खरें आहे. १८१५ ते १८७० ह्या काळांत फ्रेंच राष्ट्रांत आक्रमक वृत्तीचा पूर्ण अभाव दिसून येतो. १८७० मध्यें फ्रान्सचा जर्मनीकडून पराभव झाला व अल्सेस व लॉरेन ह्या आपल्या प्रांतांसहि फ्रान्सला मुकावें लागलें. अपमानाचें व प्रादेशिक हानीचें शल्य टोंचत राहिल्यानें १९१४ पर्यंत लष्करी संघटना जोमदार, एकजुटीची व आक्रमक ध्येयाची बनूं शकली. १९१८ नंतर फ्रान्समध्यें युद्धविन्मुखता पसरली. छावणीभोंवती खंदक खणणाऱ्या सदाशिवरावभाऊ-प्रमाणें फ्रेंच राष्ट्रानें आपल्याभोंवतीं मॅजिनो तटबंदी बांधून घेतली. युद्धाच्या डावपेचांचें जें शास्त्र आहे त्यास अनुसरून ही तटबंदी कितपत समाधानकारक होती हा प्रश्न गौण आहे. ही तटबंदी बांधण्यांत व राष्ट्राची बरीचशी शक्ती त्यावर खर्च करून निश्चित राहण्यांत जी घरकोंबडेपणाची भावना दिसून येते तीच फ्रान्सच्या नाशास कारणीभूत झाली.

फ्रान्सचें शत्रुत्व ज्या जर्मन राष्ट्राबरोबर होतें त्याची तयारी किती विविध तऱ्हेची, एकोप्याची व निकराची होती इकडे फ्रान्स-मधील अधिकारी व्यक्तींनीं पूर्णपणें दुर्लक्ष्य केलें होतें. असें नसतें तर विमानदल व रणगाडे ह्या दोन महत्त्वाच्या अंगांत फ्रान्स इतकें कमकुवत असण्याचें कारण नव्हतें. मुख्य शत्रूच्या मानानें लष्करी सामर्थ्य कमी दर्जाचें असूनहि ऐतिहासिक परंपरेनें व व्हर्सायच्या तहानें अर्ध्या युरोपचें लष्करी नेतृत्व मात्र फ्रान्सला प्राप्त झालें होतें. ह्या मोठेपणाच्या जबाबदारीला अनुरूप असें लष्करी सामर्थ्य व कर्तृत्व फ्रान्सजवळ नव्हतें. परराष्ट्रीय संबंधांचे डावपेच हे लष्करी सामर्थ्याच्या प्रमाणांत यशस्वी ठरत असतात. फ्रान्सचें लष्करी सामर्थ्य पूर्णत्वाच्या पायरीपासून ढळूं लागतांच युरोपियन राष्ट्रांस आपापल्या हिताकरतां इतरत्र करभार पोंचता करणें भाग पडलें.

आंतरराष्ट्रीय डावपेंच लष्करी सामर्थ्यावर व लष्करी सामर्थ्य औद्योगिक प्रगतीवर अवलंबून असणें हा आजच्या परिस्थितींत निसर्ग नियम आहे. फ्रान्सची लष्करी घटना एकांगी, जुनाट व युद्धपराङ्मुख होती एवढेंच नव्हे तर आक्रमक युद्धघटनेस जरूर असणारें औद्योगिक सामर्थ्यही फ्रान्समध्यें राहिलें नव्हतें. देशाची लोकसंख्या घटत असल्यानें शेतें, कारखाने व पलटणी ह्या सर्वांच्या वाढीस पायबंद बसला होता. उपलब्ध असणाऱ्या लोकांतही वर्गकलहामुळें राष्ट्रभावना संकोच पावत होती. युद्ध, हें राष्ट्रीय स्वातंत्र्याकरितां करावें लागणारें प्रासंगिक दिव्य नसून मूठभर भांडवलवाल्यांचें उखळ पांढरें व्हावें म्हणून त्यांनीं घडवून आणलेला वित्त व जीवित ह्यांचा संहार होय ही भावना वाढीस लागली होती. सर्व समाजामध्यें, व विशेषतः कारखान-दारीच्या भांडवलप्रधान घटनेमध्यें, जी सामाजिक विषमता दिसून येते तीमुळें गरीब–श्रीमंतांचा झगडा नेहमींच चालतो. परंतु राष्ट्रीय पुढारी व सरकार ह्यांनीं व्यक्ती व वर्ग ह्यांच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय जीवनाचें महत्त्व सर्वांस पटवून द्यावयाचें असतें. जर्मनी व इंग्लंड ह्या देशांत भिन्न मार्गांनें ही गोष्ट साध्य झाली परंतु फ्रेंच पुढारी व सरकार ह्यांस आपल्या अनुयायांस राष्ट्रीय ऐक्याचा धडा देतां आला नाहीं.

१८७१ मध्यें हल्लींचें प्रजासत्ताक सरकार फ्रान्समध्यें स्थापन झालें. नेपोलियन किंवा बोर्बोन ह्यांपैकी कोणत्या तरी एका वंशां-तील राजा फ्रान्सचे गादीवर असावा असे म्हणणारे सर्व पक्ष नव्या सरकारच्या विरुद्ध होते. तसेंच, शेतकरी वर्गांपैकी पुष्कळसा भागही सरकारास विरोध करणारा नसला तरी राजकारणविन्मुख होता ह्यांत शंका नाहीं. राहतां राहिले तीन वर्ग, ते धंदेवाले, मजूर व बुद्धिजीवी. ह्यांपैकी भांडवलवाले हे मुख्यत्वें-करून स्वार्थपरायण व फ्रेंच साम्राज्य वाढविण्याच्या धोरणास अनु-कूल होते. मजूर व सुशिक्षित वर्ग ह्यांमध्यें समाजसत्तावाद्यांचा भरणा फार मोठा होता. ह्या पक्षांत युद्धाबद्दल केव्हांच खरा उत्साह नव्हता. लोकशाहीच्या तत्त्वानुसार गेल्या ६०–७० वर्षें फ्रान्समध्यें साधारणतः समाजसत्तावादी पक्षांपैकीच कोणत्या ना कोणत्या तरी ४–५ गटांचें संगनमत होऊन मंत्रिमंडळ होत असे.

ह्या मंत्रीमंडळांपैकी कित्येक पुढारी पहिल्या प्रथम जहाल समाजसत्तावादी असून हळुहळु तडजोडीस व शांतमय धोरणास अनुकूल झालेले असत. मजूरवर्गासही ह्या सरकाराबद्दल विश्वास वाटत नसे. अशा रीतीनें समाजाच्या सर्व वर्गांमध्यें सरकाराबद्दल अविश्वास पसरलेला होता. संरक्षक खातीं व समाजसत्तावादी सर-कार ह्यांमध्यें परस्पर विश्वास नसे. एवढ्याही परिस्थितींत क्लेमेन्सो-सारखा धडाडीचा व कर्तृत्ववान पुढारी निपजतां तर त्यानें आपल्या देशबांधवांस आगामी संकटाचा वेळींच इशारा देऊन ऐक्य, स्वार्थ-त्याग व आक्रमक कर्तृत्व ह्यांचें महत्त्व त्यांवर बिंबवलें असतें. परंतु अलिकडील धडामोडी त्यास परिपोषक नव्हत्या.

### मोटारी

सबंध जगांत मिळून ४ कोटि मोटारगाड्या वापरांत आहेत, त्यांपैकी ३ कोटि एकट्या अमेरिकेंत आहेत.

मोटारींचें उत्पादन

| देश | वर्ष | संख्या |
|---|---|---|
| अमेरिका | १९३९ | ३५,७७,०५८ |
| कॅनडा | १९३९ | १,५५,३१६ |
| ग्रेट ब्रिटन | १९३८ | ४,५७,५६१ |
| जर्मनी | १९३८ | ३,२८,००० |
| जपान | १९३८ | ३०,००० |

## जमखंडी स्टेट सेंट्रल को. बँक

### उद्‌घाटन समारंभ

ता. २१-१०-४० रोजीं सकाळीं ९॥ वाजतां, जमखंडी येथें नुकत्याच स्थापन झालेल्या 'जमखंडी स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचा' उद्‌घाटन समारंभ श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांच्या हस्तें श्री उमा-रामेश्वर देवळा नजीकच्या इमारतींत मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. श्रीमंत चीफसाहेब ऑफ बावडा हे या समारंभास हजर राहिल्यानें समारंभास विशेष शोभा आली होती. बँकेचे चेअरमन रा. ब. दिवाणसाहेब व मॅनेजिंग डायरेक्टर्स यांनीं सर्व खाशा स्वाऱ्यांचें स्वागत केलें. त्यानंतर स्वागतपर पद्य झाल्यावर डायरेक्टर्स तर्फे श्री. अ. वि. सावडे यांनीं आलेले संदेश वाचून दाखविले.

### चेअरमन, रा. ब. दिवाणसाहेब, ह्यांचें भाषण

त्यानंतर बँकेचे चेअरमन रा. ब. दिवाणसाहेब यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. त्यांत त्यांनीं सदर बँकेच्या स्थापनेची पूर्वपीठिका थोडक्यांत निवेदन केली. ते म्हणाले:—रयतेची आर्थिक परिस्थिति सुधारणेच्या बाबतींत सन १९२५ सालीं जमखंडी दरबारनें एक समिती नेमली होती. त्या समितीनें सांगोपांग चौकशी करून सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या पतपेढ्या व बँका स्थापन करणेची शिफारस केली होती, व ती दरबारकडून मान्य करण्यांत येऊन अशा संस्थांची घटना कशा प्रकारची असावी या बाबतींत रिपोर्ट करण्यासाठीं दरबारनें या प्रश्नांचे तज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेले प्रो. काळे यांची नेमणूक केली होती. प्रो. काळे यांनीं त्यासंबंधीं जो रिपोर्ट सादर केला त्यांत शिफारस केल्याप्रमाणें सहकारी मंडळ्याबाबतचा कायदा संस्थानमजकुरीं लागू करण्यांत आला व सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक व सोसायटी या बाबतचे नियमहि करण्यांत आले. त्यानंतर जमखंडी स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना करण्यांत येऊन भांडवल गोळा करण्याचें काम गेल्या श्रीगणेश चतुर्थीचे सुमुहूर्तावर सुरू करण्यांत आलें. बँकेचे अधिकृत भांडवल ५ लाख रुपये असून प्रत्येक शेअर २५ रुपयांचा आहे. तूर्त २००० शेअर्स विक्रीस काढले आहेत व ते थोडक्याच दिवसांत खपतील असा अंदाज आहे. आज दिवाळीच्या पाडव्याच्या सुमुहूर्तावर बँक देवघेवीसाठी खुली झाल्याचें जाहीर करण्यासाठीं बँकेचा उद्‌घाटन समारंभ श्रीमंत राजेसाहेब सरकार यांचे हस्तें आज होणेचा आहे. या बँकेचा उपयोग सर्व प्रजाजनांनीं जरूर घ्यावा अशी माझी त्यांना विनंति आहे.

### राजासाहेबांचें भाषण

श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं एका चांदीच्या किल्लीनें बँकेच्या इमारतीच्या मुख्य दरवाज्याचें कुलूप काढून बँक खुली केल्याचें जाहीर केलें. सदर प्रसंगीं श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं छोटेसें पण मार्मिक असें भाषण केलें.

ते म्हणाले:—विक्रीस काढलेल्या शेअर्सपैकीं आतापर्यंत खपलेल्या शेअर्सच्या आंकड्यावरून बँकेचा उपक्रम चांगल्या प्रकारें झाला आहे असें म्हणणेस प्रत्यवाय नाहीं. दरबारतर्फे ७५०० चे शेअर्स घेतले आहे असून आम्हीं आमचे खासगींतून ९५०० रुपयांचे शेअर्स घेतले आहेत. सौ. राणीसाहेब यांनींहि आपले खासगींतून २५०० रुपयांचे शेअर्स घेतले आहेत. श्रीमंत चीफसाहेब बावडा यांनींहि ५०० रुपयाचे शेअर्स घेण्याचें अभिवचन दिलें आहे व याबद्दल आम्हीं बँकेतर्फे त्यांचे आभार मानतों. संस्थानांतील व्यापारीवर्ग आपापल्या ऐपतीप्रमाणें बँकेचे शेअर्स घेऊन सक्रिय सहानुभूति दाखवील अशी आम्हांस खात्री आहे. आजच्या पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सदर बँकेच्या देवघेवीच्या कामास सुरवात होणेची आहे. सहकारी संस्था व सहकारी बँका यांची उन्नति व भरभराट तसेंच त्यांचेवरील जनतेचा वाढता विश्वास या गोष्टी त्या त्या संस्थेंत काम करणाऱ्या मनुष्यांच्या दानतीवर, सचोटीवर आणि काम करण्याच्या कौशल्यावर अवलंबून असतात. संस्थानांत सहकारी संस्थांचा उपक्रम नव्यानेंच होत आहे. या कामीं ब्रिटिश मुलखांतील सहकारी संस्थांच्या कामाचा अनुभव उपयोगी पाडण्यासारखा आहे. संयुक्त पतीच्या शक्तीनें भांडवल मिळविणें ही सहकारी संघटनेची मूलभूत पद्धति आहे. यासाठीं अशा बँकेची आवश्यकता असते. श्रीमान व मध्यम स्थितींतील लोकांच्या बचतीचा पैसा या बँकेंत ठेवींच्या रूपानें येऊन त्याचा उत्पादनकार्याकडे उपयोग होण्याची व्यवस्था होते व त्यामुळें गरजू लोकांना तात्पुरती कर्जें मिळणें वगैरे सोयी बँकेच्या मार्फत करतां येतात. या दृष्टीनें सहकारी चळवळींत मध्यवर्ती बँकेचें स्थान महत्त्वाचें आहे. सदर बँक स्थापन करणेची योजना आमचे दिवाण रा. ब. भागवत यांनीं आम्हांस सुचविली व आमची अनुमती घेऊन व अत्यंत परिश्रमानें सदर बँकेची उभारणी केली हें पाहून आम्हांस संतोष वाटतो व यापुढेंहि त्यांच्या सूचना बँकेस मार्गदर्शक होवोत असें आम्हीं इच्छितो व सदर बँक आजपासून देवघेवीच्या व्यवहाराकरितां खुली झाली असें आम्ही जाहीर करतों. ईशकृपेनें आणि आपणां सर्वांच्या सक्रिय सहानुभूतीनें बँकेची उत्तरोत्तर भरभराट होवो अशी श्रीगणपतीचे चरणीं अनन्य भावानें प्रार्थना करून व बँकेस सुयश चिंतून आम्ही आमचें भाषण पुरें करतो.

यानंतर, श्री. देवघर वकील यांचे मराठींत व डॉक्टर दामुआण्णा हुल्याळकर व श्री. सावडे वकील यांचीं कानडींत आभारप्रदर्शक भाषणें झाल्यावर हा समारंभ समाप्त झाला.




मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए सदाशिव, पुणें २.

## अमेरिकेच्या अध्यक्षाची निवडणूक

अमेरिकेंतील प्रत्येक घटक संस्थान, ज्या वर्षी अध्यक्षाच्या जागेची मुदत संपते, त्याचे आदल्या वर्षाच्या नोव्हेंबरमधील पहिल्या सोमवार नंतरचे पहिल्या मंगळवारीं 'इलेक्टर्स' म्हणजे निवडणुकीचे मतदार निवडतें. ही मतदारांची संख्या, कॉंग्रेसमध्यें म्हणजे अमेरिकेच्या मध्यवर्ती विधिमंडळांत प्रत्येक संस्थानास किती सभासद निवडून देण्याचा अधिकार आहे त्यावर अवलंबून असते. आजी सभासदास अगर सरकारी नोकरास मतदाराचे जागेसाठी उभें रहातां येत नाहीं. डिसेंबरच्या दुसऱ्या बुधवार नंतरच्या पहिल्या सोमवारीं हे मतदार आपआपल्या संस्थानांचे राजधानींत जमून अध्यक्षाची निवड करतात. प्रत्येक ठिकाणच्या मतपत्रिका सील करून वॉशिंग्टन येथें पाठविण्यांत येतात. ६ जानेवारी रोजीं सीनेटचा अध्यक्ष कॉंग्रेसच्या समोर तें सील फोडतो व नंतर मतमोजणी होते. 'इलेक्टर्स'नीं ज्यास सर्वांत अधिक मतें दिलीं असतील, तो यशस्वी म्हणून जाहीर करण्यांत येतो. कोणाचेंच मताधिक्य न झाल्यास पहिल्या तीन उमेदवारांतून हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज् अध्यक्षांची निवड करतें. त्या वेळीं प्रत्येक संस्थानास एक मत, ह्या हिशेबानें मतनोंदणी केली जाते.

अध्यक्ष मरण पावल्यास, त्याची जागा उपाध्यक्ष घेतो व तो अध्यक्ष बनतो. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष ह्यांच्या जागेची मुदत २० जानेवारी रोजीं संपते व नंतर नवीन अध्यक्ष व उपाध्यक्ष त्यांची जागा घेतात. हे दोघेहि मरण पावले, तर त्यांची जागा भरून काढण्याची कायद्यांत तरतूद आहे. अध्यक्षाचें किमान वय ३५ वर्षें तरी असलें पाहिजे. त्यास वार्षिक ७५ हजार डॉलर पगार व प्रवासखर्च २५ हजार डॉलरपर्यंत मिळतो.

अमेरिकेचा अध्यक्ष हा फौजेचा व नाविकदलाचा कमांडर इन् चीफ असतो. सीनेटच्या संमतीनें तो कॅबिनेटमधील अधिकारी नेमतो. मध्यवर्ती सरकारचा कारभार त्याच्या देखरेखीखालीं चालतो. एखाद्या संस्थानांतील गडबड येथील अधिकाऱ्यांस मिटवतां आली नाहीं, तर अध्यक्षाची मदत मागण्यांत येते. परराष्ट्रीय राजकारण अध्यक्षच खेळतो. सीनेटच्या संमतीनें तह त्यास करतां येतात, परंतु युद्ध पुकारण्याचा अधिकार कॉंग्रेसला आहे. कॉंग्रेसला तो सर्वसाधारणपणें सूचना करतो. कॉंग्रेसनें मंजूर केलेले कायदे नामंजूर करून परत धाडण्याचा त्यास अधिकार आहे. परत पाठविलेला कायदा विधिमंडळाच्या दोन्ही शाखांनीं दोन तृतीयांश मताधिक्यानें स्वतंत्रपणें पास केला, तर त्यास अध्यक्षाची संमति लागत नाहीं; अध्यक्षानें अनुमति दिली नाहीं, तरी तो कायदा पक्का होतो.

---

## सर चार्लस मॅलेट ह्यांचीं पत्रें

सर चार्लस मॅलेट ह्याची खंबायत येथें १७७४ सालीं इंग्रजांच्या फॅक्टरीचा प्रमुख व खंबायतच्या नबाबाचे दरबारांत रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली होती. १७८४ अखेर तो ह्या जागेवर होता. १७७५ च्या सुरतेच्या तहाचे बाबतींत त्याचा निकटचा संबंध आला. मॅलेटनें ह्या मुदतींत लिहिलेलीं मूळ पत्रें लंडन येथील एका दुकानांत विक्रीस आलेलीं सर जदुनाथ सरकार ह्यांस आढळलीं, त्यांतील ८९ पत्रें "सर सी. डब्ल्यू. मॅलेटचीं निवडक पत्रें—१७८० ते १७८४" ह्या नांवाखालीं मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलीं आहेत. ह्या पत्रांत दरबारांतील उलाढाली, गायकवाड राज्यांतील महत्त्वाच्या घडामोडी, गुजरातमधील लढाया, इत्यादींची हकीकत आली आहे. पुस्तकाची किंमत २ रु. ८ आ. आहे.

सर्व तऱ्हेचीं कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth) दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा: दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा: डेक्कन जिमखाना

दि बँक ऑफ इंडिया लि.
[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र ऑफिस ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी (मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी. ( रजेवर ); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. फेराई.

करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) ... ... | ११२—६ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९२—७ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०२—२ |
| ३% (१९६३-६५) ... ... ... | ९१—६ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९५-१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०५—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०५—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५१-६१) ... ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% ... ... | १३६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०२—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ... | ३८—१४ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% ... ... | १५४०—० |
| बॉंबे मॉ. को. बँक (५०) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% ... ... | १२८—१२ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १४८२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १६५०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४½% ... ... | ९८—० |
| पाचोरा-जामनेर (१००) ३½% ... ... | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९२—८ |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ७७३-१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २१५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. ... ... | ४६—० |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २०-१३ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. ... | ३९—६ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ९% ... ... | २०८-१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १० रु. १० आ. ... | १४७—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३६३—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै. ... | १८४२—४ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १२१—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें (फिट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-११-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६१-१२ |


# दि गुड-वुइल अॅशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर

देशी औषधें तयार करणारा प्रमुख कारखाना

पंडु, (अॅनिमिया) सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

अशक्ततेवर

# रक्तवर्धक

वापरा.

सर्वत्र मिळतें.

— केंद्रें :—

पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि. पुणें ४.

## दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांचीं गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर-Amritsar.



### स्पृहणीय यश
## बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख १० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक—दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

## दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
### कंपनी लि० पुणें


लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.



## फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट  फुकट  फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून त्याचा तसाच आवाज होतो. त्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. त्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू त्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचें तेल
डोकें थंड रहातें. केंस मजबूत होतात, गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
स्थापना १९०६
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)



तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अतिस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल अॅन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स अॅकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**For Collegians**
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**
*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. कृ. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ५००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर | **महिंद्रकर ब्रदर्स** तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद् वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. ११७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.